**महाराष्ट्र शासन**

उपवनसंरक्षक, पुणे वन विभाग, यांचे कार्यालय

सेनापती बापट मार्ग, पुणे 411 004

दूरध्वनी- 020 2566 0593

ई-मेल-dycfpune@gmail.com

क्रमांक:- ब/ कक्ष-4.2/ जमीन/५५०/2022-23 दिनांक:- 29 /08/2022

**पत्र**

विषय - Laying of underground OFC for High –speed Broadband Connectivity to Gram Panchayat in Mulshi Block of Pune District in the State of Maharashtra (FP/MH/OFC/145751/2021

संदर्भ - या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष 4.2/जमीन/एफसीए/145/2022.23 दि.05/08/2022

वन (संवर्धन) अधिनियम 1980 अंतर्गत पुणे वनविभागामधील मौजे-ताम्हिणी,पिंपरी,भांबर्डे या गावांमधील प्रस्तावित ओ.एफ.सी. कामासाठीचा प्रस्ताव वरील संदर्भिय पत्रान्वये शासन मान्यतेस्तव वरीष्ठ कार्यालयास सादर केला आहे.

प्रकरणी वरील प्रस्तावाची ऑनलाईन पार्ट-1 ची प्रत या कार्यालयास सादर केलेली नाही असे वरील संदर्भिय पत्रामध्ये नमुद केलेले आहे.दि.26/08/2022 रोजी परिवेश पोर्टलवर नमुद प्रस्तावाची ऑनलाईन पार्ट-1 या विभागाकडे दिसुन आली आहे तथापी त्यामध्ये मौजे वारक गावामध्ये वनक्षेत्र दर्शविले आहे मात्र प्रस्तावाचे हार्ड कॉपीमधील क्षेत्र विवरणामध्ये मौजे वारक गाव दाखवले नाही तसेच ऑनलाईन पार्ट-1 मध्ये मौजे पिंपरी गावामध्ये राखीव वनक्षेत्र 0.171264 हेक्टर दर्शविले आहे मात्र प्रस्तावाचे हार्ड कॉपीमधील क्षेत्र विवरणामध्ये सदर गावाचे क्षेत्र 0.101766 हेक्टर दर्शविले आहे. त्यामुळे हार्ड कॉपीमधील क्षेत्र विवरणामधील आकडेवारी व ऑनलाईन पार्ट-1 मधील आकडेवारी याचा मेळ घालुन सुधारीत ऑनलाईन पार्ट-1 या कार्यालयास सादर करावा जेणेकरुन या विभागाचा ऑनलाईन पार्ट-2 बाबत संस्करण करणे शक्य होईल.

प्रस्तावीत बीएसएनएस ओ.एफ.सी. हे केंद्र सरकारचे महत्वकांक्षी प्रकल्प असुन वन (संवर्धन) अधिनियम 1980 अंतर्गत चे प्रस्तावाबावत कालमर्यादेमध्ये मंजुरी प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे त्यामुळे या कामास प्रथम प्राधान्य देवुन वरील परिच्छेदामध्ये उपस्थित मुदयांची तात्काळ पुर्तता करावी.

**( राहुल पाटील,भावसे )**
**उपवनसंरक्षक,**
**पुणे वनविभाग,पुणे**

**प्रती,**

उप मंडल अधिकारी, (एन.ओ.एफ.एन/ओ.एफ.सी.)
बी.एस.एन.एल.बाजीराव रोड,पुणे-411002

**प्रतिलिपी** - मा. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी,म.रा.नागपुर यांना माहितीस्तव सविनय सादर

**प्रतिलिपी** - मा.मुख्य वनसंरक्षक (प्रा.) पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर

3322